प्रेसनोट दिनांक १०/०७/२०१९.

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## विटा पो.स्टे. जिल्हा-सांगली येथील गुन्हयातील अपहृत अल्पवयीन मुलगी विश्रामबाग पोलीसांचे ताब्यांत

दिनांक-०९/०७/२०१९ रोजी सायंकाळी १९-०० वाजताचे सुमारांस विश्रामबाग पोलीस ठाण्याचे अंकीत मंडई पोलीस चौकीच्या प्रभारी अधिकारी पोलीस उप निरीक्षक सौ. स्नेहल थोरात या कर्तव्यावर हजर असतांना त्यांना मंडई पोलीस चौकीचे समोरच असणा-या बांगडीचे दुकानात एक अंदाजे १६-१७ वर्षाची व तोंडाला रुमाल बांधलेली अल्पवयीन मुलगी बांगडया भरीत असतांना दिसली. सौ.स्नेहल थोरात,पोलीस उप निरीक्षक यांना सदर मुलीचे वागणे संशयास्पद वाटल्याने त्यांनी सदर मुलीजवळ जावुन तिला तिचे नांव,पत्ता विचारला असता तिने तिचे खोटे नांव, पत्ता व चुकीचा मोबाईल नंबर सांगितला.

सदरवेळी सौ.स्नेहल थोरात यांना सदरची मुलगी काहीतरी खोटे बोलुन काहीतरी लपवित असल्याचे लक्षात आल्याने त्यांनी तिला विश्वासांत घेवुन तिचेकडे अधिक विचारपुस करता तिने ती मु.पो.खंबाळे, ता.खानापुर, जिल्हा-सांगली येथील राहणारी असल्याचे सांगितले. सदरवेळी मिळालेल्या माहितीवरुन पोलीस उप निरीक्षक सौ.स्नेहल थोरात यांनी तात्काळ विटा पोलीस ठाण्याशी संपर्क साधुन वरनमुद अल्पवयीन मुलीबाबत खातरजमा केली असता तिचे खरे नांव व पत्ता समजुन आला. तसेच तिचे मिसिंग संदर्भात विटा पोलीस स्टेशनमध्ये भा.दं.वि.सं.कलम ३६३ प्रमाणे गुन्हा नोंद असल्याचे समजुन आले. सदरवेळी पोलीस उप निरीक्षक सौ.स्नेहल थोरात यांनी विटा पोलीस ठाण्याचे पोलीसांशी चर्चा करुन मुलीच्या नातेवाईकांचा शोध घेवुन त्यांना त्यांची मुलगी मिळालेली असल्याचे कळवुन व योग्य त्या कायदेशिर प्रक्रियेचा अवलंब करुन वरनमुद अल्पवयीन मुलीस आज दिनांक-१०/०७/२०१९ रोजी सदर मुलीस तिचे आई-वडीलांचे ताब्यांत दिलेले आहे. सदरवेळी वरनमुद अल्पवयीन मुलीच्या आई-वडीलांनी पोलीस उप निरीक्षक सौ.स्नेहल थोरात यांनी केलेल्या कामाचे कौतुक करुन पोलीसांचे आभार व्यक्त केले.

(सुनिल कलगुटकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर